# जाहिरात नमुना

**महाराष्ट्र शासन**

(स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि.प. नागपूर)

## स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)

## Expression of Interest Notice

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत व्यावसायिक / स्वयंसेवी संस्था म्हणून कार्य करु इच्छिणा-या संस्थांची विहीत नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत नागपूर जिल्हयात निवडक गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी प्रकल्प कामांकरीता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणा-या व्यावसायिक / स्वयंसेवी संस्था यांचेकडून सहयोग देण्याची इच्छा असेल अश्यांकडून अर्ज या कार्यालयास मागविण्यात येत आहे. याबाबतचे कामाचे प्रारुप, अटी व शर्ती www.nagpurzp.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| **अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख: २३-जून २०२१** | **वेळ: सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** |

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा**
**जि.प.नागपूर**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**
**जि.प.नागपूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५५०३९८**

**ई-मेल- sbmg2zpnagpur@gmail.com**

**कार्यालयाचा पत्ता: जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष, जुनी इमारत, दुसरा माळा, जिल्हा परिषद परिसर, सिव्हिल लाईस, नागपूर**

# जिल्हा परिषद, नागपूर
## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन

**घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरितासर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे**

**या करीता स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)**

**सादर करण्या बाबत**

व्यावसायिक स्वयंसेवी संस्थेचा नाव व पत्ता:------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

संपर्क व्यक्तीचे नाव व संर्पक क्रमांक-

संस्थेचा ईमेल

## प्रारुप- अ

### स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था निवडी करीता गुणांकन घटक

| अ.क्र. | विवरण | विश्लेषण | गुण |
|---|---|---|---|
| 1 | संस्थेचा विषयासंबधी अनुभव | संस्थेस पाणी पुरवठा व स्वच्छते संदर्भात कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा | 40 |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | संस्थेस पाणी पुरवठा व स्वच्छता किंवा इतर विभागात शासना सोबत कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा | 20 |
| 3 | तज्ञ व प्रशिक्षीत मनुष्यबळ | संस्थे कडे विषयाचे अनुषंगाने किमान 2 अनुभवी स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता व 3 अनुभवी सामाजकार्य तज्ञ मनुष्यबळ असयाला हवे | 10 |
| 4 | लेखा परिक्षण | संस्थेने मागील 3 वर्षाचे लेखा परिक्षण व अहवाल मान्यकृत सनदी लेखापाल व्दारा केलेला असावा. | 10 |
| 5 | आर्थिक उलाढाल | संस्थेची वार्षिक आर्थिक उलाढाल किमान 25 लाख व त्यापेक्षा अधिक असावी | 10 |
| 6 | जिल्हा अंतर्गत कार्यक्षेत्र | संस्थेचे मुख्य कार्यालय व संस्थेचे कार्यक्षेत्र नागपूर जिल्हातंर्गत असल्यास प्राधान्य | 10 |
| | **एकुण गुण** | | 100 |

## प्रारुप- ब

### प्रारुप - अ नुसार स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था निवडी करीता गुणांकन घटकाचे वर्गीकरण

| अ.क्र. | विवरण | अनुभव वर्षात | गुण | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | संस्थेचा घनकचरा-सांडपाणी, पाल्सटीक वेस्ट व्यवस्थापन, फीकेल सलेज व्यवस्थापन व गोबरधन विषयक कामाचा अनुभव | किमाण 3 वर्षे | 25 | सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 25 गुण आवश्यक |
| | | 3 ते 5 वर्षे | 30 | |
| | | 5 ते 7 वर्षे | 35 | |
| | | 7 वर्षा पेक्ष्या अधिक | 40 | |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | किमाण 3 वर्षे | 10 | सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 10 गुण आवश्यक |
| | | 3 ते 5 वर्षे | 15 | |
| | | 5 वर्षा पेक्ष्या अधिक | 20 | |
| 3 | मनुष्यबळ | 2 स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता व 3 समाजकार्य तज्ञ | 5 | सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 5 गुण आवश्यक |
| | | उपरोक्त पेक्षा अधिक | 10 | |
| 4 | लेखा परिक्षण | मागील 3 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल | 10 | अनिवार्य गुण |
| 5 | आर्थिक उलाढाल | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 25 लाख वार्षिक उलाढाल असल्यास | 5 | सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 5 गुण आवश्यक |
| | | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 25 लाखा पेक्ष्या अधिक वार्षिक उलाढाल असल्यास | 10 | |
| 6 | जिल्हा अंतर्गत कार्यक्षेत्र | संस्था मागील किमाण 3 वर्षे पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास | 5 | प्राधान्य |
| | | संस्था मागील किमान 3 वर्षे पेक्षा अधिक कालावधी पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास | 10 | |
| **उपरोक्त प्रमाणे घटक निहाय सर्व घटक मिळुन किमान आवश्यक 55 गुण प्राप्त होणाऱ्या संस्थाची अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.** | | | 55 | |

## प्रारुप- क

## स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था अनुभव

| अ.क्र. | विवरण | अनुभव वर्षात | संस्था पुर्ण करीत असलेली अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | संस्थेचा विषयासंबधी अनुभव | किमान 3 वर्षे | |
| | | 3 ते 5 वर्षे | |
| | | 5 ते 7 वर्षे | |
| | | 7 वर्षा पेक्षा अधिक | |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | किमान 3 वर्षे | |
| | | 3 ते 5 वर्षे | |
| | | 5 वर्षा पेक्षा अधिक | |
| 3 | मनुष्यबळ | 2 स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता व 3 समाजकार्य तज्ञ | |
| | | उपरोक्त पेक्षा अधिक | |
| 4 | लेखा परिक्षण | मागील 3 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल | |
| 5 | आर्थिक उलाढाल | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 25 लाख वार्षिक उलाढाल असल्यास | |
| | | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 25 लाखा पेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असल्यास | |
| 6 | जिल्हा अंतर्गत कार्यक्षेत्र | संस्था मागील किमान 3 वर्षे पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास | |
| | | संस्था मागील किमाण 3 वर्षे पेक्षा अधिक कालावधी पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास | |

**प्रपत्र ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे घटक निहाय सर्व घटक मिळुन किमान आवश्यक 55 गुण प्राप्त होणाऱ्या संस्थाची अंतिम निवड यादि प्रसिध्द करण्यात येईल.याबाबत संस्थेचा कोणताही विनंती ग्राहय धरण्यात येणार नाही.**

प्रपत्र- ड

## स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणाऱ्या व्यावसायिक संस्था व स्वयंसेवी संस्था संस्थानी अर्जा सोबत सादर करावयाची कागदपत्रे.

- संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० व संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.
- व्यावसायिक संस्था करीता कंपनी अधिनियम 1956, भागीदारी कायदा किंवा सहकार कायदा अंतर्गत अन्य त्तसम प्राधिकरण नोंदणी प्रमाणपत्र.
- मागील 3 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल.
- संस्थेचे शेडयुल ए व बी. व्यावसायिक संस्थाचे सदस्य संबंधातील दस्ताऐवज.
- GST , PAN नंबर व प्रमाणपत्र.
- Income Tax उत्पन्न कर भरल्याबाबत प्रमाणपत्र.
- उपलब्ध मनुष्यबळ यादी शिक्षण व अनुभवासह.- गोषवारा विवरणपप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- कामाचा अनुभवाचे आदेश व अहवाल. - गोषवारा विवरण पप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- आर्थिक उलाढाल संदर्भात बँक विवरण अथवा सनदी लेखापाला यांचे प्रमाणपत्र. गोषवारा विवरणपप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- संस्था काळा यादीत समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.
- व्यावसायिक संस्था करिता व्यवसाय व कर नोंदणी प्रमाणपत्र.भागीदारी व्यासायिक संस्था प्रमाणपत्र.
- संस्थेने अर्जासोबत जोडलेली व नमुद केलेली सर्व माहिती हि सत्य असल्याचे स्वंयघोषित प्रमाणपत्र.

## व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांचे एम्पॅनेलमेंट करीता अटी व शर्ती.

1. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र अनिवार्य असुन सादर करावे लागतील.
2. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्थाना यांचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल सादर करावे लागतील.
3. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्थाना GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड आवश्यक आहे.
4. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्थान कडे अनुभवी सोशल व तांत्रिक मनुष्यबळ असने गरजेचे आहे.
5. एम्पॅनलमेंट करण्यात आलेल्या संस्थेचा कार्यकाळ एक वर्षापर्यंत राहील. तथापी निवडी नंतर कार्यादेश प्राप्त झालेल्या संस्था प्रकल्प पुर्ण होईस्तोवर कार्यरत राहतील.
6. संस्थेस घनकचरा व सांडपाणी कार्यक्रमा करीता सर्वेक्षण, आराखडा तयार करणे(DPR) व पर्यवेक्षण करणे तांत्रिक सल्ला याबाबत शासकीय विभागात कामाचा अनुभव असावा.
7. स्थानिक जिल्हयातंर्गत कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.
8. शासन निर्णया नुसार निश्चित करण्यात आलेल्या निकषा प्रमाणे अंदाज पत्रक/ आराखडे तयार करणे अनिवार्य राहील. तांत्रिक पडताळणी मध्ये या निकषा प्रमाणे नसलेले आराखडे स्वीकार्य राहणार नाही व या करीता कुठलेही शुल्क देय राहणार नाही.
9. सर्शत स्वारस्य अभिव्यक्ती(EOI) स्वीकारण्यात येणार नाही.
10. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्ये प्राप्त संस्थाची यादी गुणांकणाचे आधारे तयार करण्यात येईल.
11. संस्थेची निवड ही किमान प्राप्त गुणांच्या आधारे अंतिम करण्यात येईल. प्रपत्र ब मधील विवरना नुसार किमान ५५ गुण प्राप्त असणाऱ्या संस्थाचा पडताळणी करीता पात्र राहतील.
12. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्ये पात्र असणाऱ्या संस्थाची यादी हि कार्यादेश म्हणुन समजण्यात येणार नाही.
13. ग्राम पंचायत स्तरावर कामाचे अनुषंगाणे सक्षम प्राधिकरण यासंबंधी कार्यादेश निर्गमित करेल.
14. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था जाहीरात प्रकाशित झाल्याचे दिनांक पासुन ७ दिवसांचे आत पंजीकृत पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयात प्रस्ताव सादर करु शकतील. उशीरा आलेले प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाही.
15. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्थांचे प्रस्ताव मुदत कालावधी मध्ये कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकृत करण्यात येईल.
16. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्ये पात्र ठरविण्यात आलेल्या संस्थेस सक्षम प्राधिकरणा मार्फत कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर त्यांना नियोजित कामाकरिता गावाच्या अंदाजपत्रकीय आरखडयाच्या ५ % किंवा रुपये १.०० लक्ष यापैकी जी कमी असेल ती रक्कम संस्थांचे शुल्क म्हणुन देय राहील. मात्र या करीता आराखडयात तशी तरतुद करणे अनिवार्य राहील.
17. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांनी प्रस्ताव सादर करते वेळी उपरोक्त नमुद सर्व प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.
18. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांची निवड करण्यात आल्यास त्यांना शासकीय दरानुसार मुद्रांकावर विहित नमुन्यात निश्चित अटी व शर्ती नुसार संबंधीत प्राधिकरणा सोबत करार करणे बंधनकारक राहील. व त्या करारनुसार संस्थेस काम करणे बंधनकारक राहील.

19. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांची निवड करण्यात आल्यास त्यांना शासकीय दरानुसार मुद्रांकावर विहित नमुन्यात निश्चित अटी व शर्ती नुसार संबंधीत प्राधिकरणा सोबत करार करणे बंधनकारक राहील. व त्या करारनुसार संस्थेस काम करणे बंधनकारक राहील.

20. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांना सक्षम प्राधिकरणा मार्फत कार्यादेश प्राप्त झाल्यांनंतर निश्चीत करुन देण्यात आलेल्या मुदतीत सर्वेक्षण करणे, आराखडे तयार करणे (DPR) तयार करणे, अंदाज पत्रक सादर करणे ही जवाबदारी संस्थेची राहील.

21. प्रकल्पात निवडण्यात आलेल्या गावांची संख्या शासनाचे निर्देश व निधीच्या उपलब्धते नुसार कमी जास्त करण्यात येईल.

22. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांचे कामाचे सनिंयत्रन व मुल्यांकन कार्यकारी अभियंता ग्रापापु जि.प. नागपूर यांचे मार्फत ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग हे करतील. तर व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांचे कामाचे जिल्हा स्तरीय सनिंयत्रण व मुल्यांकन व मार्गदर्शन स्वच्छता तज्ञ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांचे व्दारे करण्यात येईल.

23. स्वारस्य अभिव्यक्ती संबंधी प्रक्रिया कुठल्याही स्तरावर थांबविण्याची, रदद करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे राखीव राहतील.

24. संस्थानी करार झाल्यानंतर कोणत्याही टप्यावर कराराचा भंग केल्यास अथवा सेवा थांबविल्यास त्यांची करारनामा नुसार अमानत रकम्म परत करण्यात येणार नाही.

25. संस्थानी आरखडा तयार करीत असतांना वा प्रत्यक्ष कामाची अंमलबजावनी करतांना पर्यावरणीय , पाणी गुणवत्ता व भुजलविषयक नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील.

26. संस्थाचे काम, सेवा समाधानकारक नसल्यास त्यांच कामाबाबत ग्राम पंचायत मार्फत तक्रार प्राप्त झाल्यास अथवा ग्राम पंचायत व संस्था यांचे दरम्यान कुठल्याही विषयावर वाद उत्पन्न झाल्यास यासंदर्भात अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचा राहील.

27. निवड झालेल्या संस्थेना कामाचा नियमित अहवाल संबंधित विभागास सादर करावा लागेल.

28. निवड झालेल्या संस्थेने करारात नमुद करण्यात आल्याप्रमाणे अमानत रक्कम % जमा करणे अनिवार्य राहील.

29. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रमा अंतर्गत खालील प्रमुख उपांगाचा समावेश करण्यात आलेला आहे.(शासन निर्णय 28.10.2020 चे विवरण पत्र- ड नुसार)

1)घनकचरा व्यवस्थापन 2) सांडपाणी व्यवस्थापन 3) प्लास्टीक कचरा व्वस्थापन 4) मैला गाळ व्यवस्थापन 5) गोबरधन प्रकल्प.

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा**
**जि.प.नागपूर**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**
**जि.प.नागपूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**